# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी.जि.-अहमदनगर 413 722

फोनन. :- 02426-243226

ई मेल:- comptroller.mpkv@gov.in


जा.क.नियंत्रक/परिपत्रक/362/2019
दि. 23/07/2019

## परिपत्रक

**विषय** :- राज्य शासनेतर विशेषत: भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त होणा-या निधीच्या विनियोगास्तव त्यांनी निर्देशीत केलेल्या प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मान्यता विषयक तरतुदींचे पालन करण्याबाबत.

विदयापीठांतर्गत विविध संशोधन प्रकल्प / उपक्रम, शैक्षणिक, बांधकाम, व इतर प्रयोजनार्थ भाकृअप / जागतिक बँक अनुदानीत प्रकल्प / राज्य शासन व इतर शासकीय संस्था व योजनांच्या माध्यमातून विदयापीठास निधी प्राप्त होत असतो. निधी विनियोग करतांना प्रचलीत नियमांनुसार रु. 3.00 लक्ष पेक्षा अधिक खर्चाच्या बांधकामांचे प्रस्ताव आणि रु. 5.00 लक्ष पेक्षा अधिक रक्कमेचे उपकरणे व साधनसामुग्री खरेदीचे प्रस्ताव कार्यकारी परिषदेच्या मान्यतेनंतर मा. कृषि परिषद, पुणे व गरजे नुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय मान्यतेस सादर केले जातात.

राज्य शासनाशिवाय अन्य विशेषत: भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त होणा-या निधीसोबत प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मान्यता विषयक नियमांसह विहीत मार्गदर्शक सूचना, प्रकल्प / योजना मंजूर करतांना तसेच वार्षिक निधी वितरीत करतांना, नियमीतपणे प्राप्त होतात. त्यांन्वये विविध मान्यता त्या निधी देणा-या संस्थेकडून प्राप्त करणे अभिप्रेत आहे. त्या संस्थांच्या विहीत मान्यता घेऊन राज्य शासनाच्या निर्देशान्वये व प्रचलीत कार्यपध्दतींन्वये पुन्हा कार्यकारी परिषदेच्या शिफारशीने ( बांधकाम विषयक प्रस्तावासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक मान्यतेसह ) मा. कृषि परिषदेची व आवश्यकतेनुसार

राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता घेणे यामध्ये पुनरावृत्ती होते व कालापव्यय यामुळे निधी अखर्चीत राहण्याचे प्रमाण वाढते, अथवा वेळीच खर्च करुन अधिक निधीसाठी संबंधीत संस्थेकडे पाठपुरावा करण्याची संधी मिळत नाही.

यास्तव राज्य शासनाशिवाय अन्य संस्थांकडून प्राप्त होणा-या निधी या विनियोगास्तव प्रशासकीय वित्तीय व तांत्रिक मान्यता विषयक नियमांसह विहीत मार्गदर्शक सूचनांन्वये कार्यवाही करणेबाबत मा. कृषि परिषदेच्या 99 व्या बैठकीमध्ये ठराव क्र. 18/99/2019 अन्वये " राज्य शासनेतर विशेषत भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त होणा-या निधीच्या विनियोगास्तव त्यांनी निर्देशित केलेल्या प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मान्यता असलेले प्रस्ताव पुन्हा मान्यतेसाठी कृषि परिषदेकडे सादर करण्यात येऊ नयेत. परंतू सदरचे प्रस्ताव कृषि परिषदेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात यावेत " असे आदेशीत केले आहे. त्यानुषंगाने राज्य शासनेतर विशेषत: भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त होणा-या निधीच्या विनियोगास्तव भाकृअप यांनी निदेशीत केलेल्या प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मान्यता विषयक तरतुदींनुसार यापुढे विहीत कार्यवाही करावी.

नियंत्रक,
म.फु.कृ.वि राहुरी

सोबत : मा. कृषि परिषदेच्या 99 व्या
बैठकीतील ठराव

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित...

१ मा. संचालक कृषि शिक्षण , संशोधन व विस्तार शिक्षण, म.फु.कृ.वि, राहुरी.
२ सहयोगी अधिष्ठाता, शिक्षण व संशोधन व (सर्व), विभाग प्रमुख (सर्व).
३. विद्यापीठ अभियंता, म.फु.कृ.वि, राहुरी.
४. विद्यापीठ ग्रंथपाल, म.फु.कृ.वि, राहुरी.
५. उप-कुलसचिव प्रशासन / विद्या, सहा.नियंत्रक/सहा. कुलसचिव (सर्व).
६. अधिदान व लेखा अधिकारी पुणे/धूळे/राहुरी/कोल्हापुर/ अति. अधिदान व लेखा अधिकारी म.फु.कृ.वि, राहुरी.
७. शाखा प्रमुख / प्रभारी अधिकारी / योजना प्रमुख (सर्व).
८. विद्यार्थी कल्याण अधिकारी, प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालये (सर्व), कृषि तंत्र विद्यालय मालेगाव.
९. मा.कुलगुरु, कुलसचिव यांचे स्विय सहायक, म.फु.कृ.वि, राहुरी.